आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र संध्याकाळी ७.०० वाजता

२ फेब्रुवारी २०२३ – गुरुवार

**ठळक बातम्या**

- विधानपरिषदेच्या कोकण शिक्षक मतदारसंघात भाजपाचे ज्ञानेश्वर म्हात्रे विजयी, नाशिकमध्ये सत्यजित तांबे तर नागपूर, अमरावती आणि औरंगाबादमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार आघाडीवर

- मुंबईतल्या प्रदुषण नियंत्रणासाठी हवा शुद्ध करणारी यंत्रणा लावण्याची मुख्यमंत्र्यांची पालिकेला सूचना

- कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कार्यकारी संचालकांसह ५ कर्मचारी ईडीच्या ताब्यात

- वर्ध्यामध्ये उद्यापासून ९६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

**आणि**

- खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत नेमबाजीत महाराष्ट्राच्या संघाची रौप्य आणि कांस्य पदकाची कमाई

<><><><><>

विधान परिषदेच्या पाच जागांसाठी झालेल्या निवडणुकीत कोकणची जागा भाजपानं जिंकली असून तीन ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार आघाडीवर आहेत. नाशिकमधे महाविकास आघाडी पुरस्कृत उमेदवार पिछाडीवर आहे.

**कोकण** विभाग शिक्षक मतदारसंघात भाजपाचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे पहिल्या पसंतीच्या क्रमानुसार विजयी झाले आहेत. या निवडणुकीत ३५ हजार ६९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यापैकी १ हजार ६१९ मते बाद झाल्यानं ३३ हजार ४५० मतं वैध ठरली. विजयासाठी पहिल्या पसंतीची १६ हजार ७२६ मतं आवश्यक होती. म्हात्रे यांना २० हजार ६४८ मतं मिळाल्यानं ते विजयी झाले. विद्यमान आमदार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बाळाराम पाटील यांना १० हजार ९९७ मतं मिळाली. या विजयाबद्दल उद्योग मंत्री उदय सामंत यांनी ज्ञानेश्वर म्हात्रे यांचं अभिनंदन केलं आहे. हा विजय म्हणजे शिंदे-फडनवीस सरकारवर कोकणवासियांनी दाखवलेला विश्वास असल्याचं सामंत यांनी म्हटलं आहे.

**अमरावती** विभाग पदवीधर मतदारसंघात मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीतही महाविकास आघाडीचे उमेदवार धीरज लिंगाडे १ हजार ६०० मतांनी पुढं होते.

**नागपूर** विभाग शिक्षक मतदारसंघात २६ हजार ९०१ वैध मतांपैकी महाविकास आघाडी पुरस्कृत सुधाकर अडबाले यांना १४ हजार ६९, तर भाजपा पुरस्कृत नागो गाणार यांना ६ हजार ३६६ मतं मिळाली.

**नाशिक** विभाग पदवीधर मतदार संघात मतमोजणीच्या पहिल्या फेरीत अपक्ष उमेदवार सत्यजित तांबे ७ हजार ९२२ मतांनी आघाडीवर होते. त्यांना १५ हजार ७८४, तर तर महाविकास आघाडी पुरस्कृत शुभांगी पाटील यांना ७ हजार ८६२ मतं मिळाली आहेत.

**औरंगाबाद** विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या मतमोजणीच्या पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार विक्रम काळे २० हजार ७८ मत घेऊन आघाडीवर आहेत. अपक्ष उमेदवार सूर्यकांत संग्राम विश्वासराव हे १३ हजार

५४३ मतं घेऊन दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार किरण पाटील यांना १३ हजार ४८९ मतं मिळाली आहेत.

<><><><><>

पिंपरी-चिंचवड आणि पुण्यातील कसबा मतदारसंघात विधानसभेची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या दोन्ही जागा महाविकास आघाडी एकत्रित लढणार असून महाविकास आघाडीच्या उद्याच्या बैठकीत यावर निर्णय होईल, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. प्रदेश काँग्रेस संसदीय मंडळाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत ते आज बोलत होते. कसबा हा काँग्रेसचा पारंपरिक मतदारसंघ असून या मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास काँग्रेसकडून ६ उमेदवार इच्छुक आहेतही नावे हायकमांडकडे पाठवली जातील आणि त्याचा निर्णय घेतला जाईल असं पटोले यांनी बैठकीनंतर सांगितलं.

<><><><><>

मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात प्रदूषण नियंत्रण, आरोग्य व्यवस्थेचं बळकटीकरण, प्रशासनात पारदर्शकता, सुशोभिकरण यांचा अंतर्भाव करावा, असं निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका आयुक्त इक्बाल सिंग चहल यांना दिले आहेत.

मुंबईतल्या प्रदूषण नियंत्रणासाठी आणि हवेची गुणवत्ता नियंत्रित राहण्यासाठी दिल्ली, गुडगाव, लखनऊ प्रमाणे एअर प्युरीफायर टॉवर मुंबईतही बसवावेत, त्याचबरोबर शहरी वनीकरण वाढेल यासाठी उपाययोजन कराव्यात, मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या रुग्णांची घरोघरी जाऊन तपासणी करावी, त्यांचा डाटा तयार करावा, महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये बाह्यरुग्ण विभागात गर्दीमुळे येणारा ताण कमी करण्यासाठी बाह्ययंत्रणांची मदत घेतानाच खिडक्यांची संख्या वाढवावी,

एमआरआय, सीटीस्कॅन आणि निदान केंद्रं वाढवावीत, डायलिसीस केंद्रं उभारावीत, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी आयुक्तांना दिल्या आहेत.

महापालिका शाळेत कौशल्य विकास केंद्र सुरु करावं, पब्लिक स्कूलची संख्या वाढवावी, नागरिकांना सर्व सुविधा सुलभ आणि सहज मिळतील अशा पद्धतीनं सुशासनावर भर द्यावा, महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे.

<><><><><>

शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून तो जगला पाहिजे हीच राज्य भूमिका आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज जालना जिल्ह्यात वाटूर इथं ऑर्ट ऑफ लिव्हिंगच्या जलतारा प्रकल्पांतर्गत आयोजित शेतकरी मेळाव्यात बोलत होते. मागच्या सरकारनं बंद केलेल्या जलयुक्त शिवार, वॉटर ग्रीड, सिंचन आदी योजना पुन्हा सुरू केल्या जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

आर्ट ऑफ लिव्हिंग राबवत असलेला जलतारा प्रकल्प शेतकऱ्यांच्या जीवनाला संजीवनी देणारा असून यापुढं सरकारमार्फत हा प्रकल्प राबवला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. या प्रकल्पामुळे सिंचनक्षेत्रात क्रांती घडेल, असं ऑर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री श्री रवीशंकर यांनी सांगितलं.

<><><><><>

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अर्थमंत्री म्हणून प्रथमच राज्याचा २०२३ चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अर्थसंकल्पासाठी त्यांनी महाराष्ट्रातील जनतेकडून काही अभिनव संकल्पना मागवल्या आहेत. या सूचना नागरिकांना bit.ly/MahaBudget२३ संकेतस्थळावर पाठवता येतील.

<><><><><>

राज्यातल्या बाल सुधारगृहांमध्ये कौशल्यपूर्ण प्रशिक्षण केंद्र सुरू करणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. डोंगरी इथल्या चिल्ड्रन एड सोसायटीमध्ये कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. चिल्ड्रन एड सोसायटीच्या मानखुर्द येथील बालगृहामध्ये फॅशन डिझायनिंग, फ्रेम डिझाईनिंग, संगणकाचे कौशल्यपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. तर डोंगरीच्या निरीक्षण गृह येथे टाटा मोटर्सच्या माध्यमातून ३ महिन्यांचा प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला आहे. यामध्ये मोबाईल दुरुस्ती, दुचाकी आणि इलेक्ट्रिकचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मानखुर्द आणि डोंगरी येथील बालकांचा कल लक्षात घेवून तसेच त्यांना समुपदेशनच्या माध्यमातून कौशल्य विकास व्हावा यासाठी भव्यता फाऊंडेशनच्या वतीनं समुपदेशन वर्ग सुरू करणार असल्याचं भव्यता फाउंडेशनचे संस्थापक मणियार यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रवादीचे नेते आमदार हसन मुश्रीफ अध्यक्ष असलेल्या कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची काही महत्त्वाची कागदपत्र सक्तवसुली संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी आज दुसऱ्या दिवशी कसून चौकशीनंतर जप्त केली तसंच बँकेचे कार्यकारी संचालक डॉ ए बी माने यांच्यासह पाच कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतलं आहे. तब्बल ३६ तास कसून चौकशी केल्यानंतर आज दुसऱ्या दिवशी बँकेच्या मुख्य शाखेमधून ईडीचे अधिकारी बाहेर पडले.

<><><><><>

वर्ध्यामध्ये उद्यापासून ९६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरू होणार आहे. सकाळी आठ वाजता महात्मा गांधींच्या पुतळ्यापासून ग्रंथदिंडीला सुरूवात होईल. ग्रंथदिंडीदरम्यान वर्ध्यातली विविध महत्त्वाची ठिकाणं दाखवली

जाणार आहे. सकाळी साडे १० वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन होईल. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, संमेलनाध्यक्ष न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, पूर्वाध्यक्ष भारत सासणे उपस्थित राहतील.

**- होल्ड व्हाइस कास्ट- -**

**<><><><><>**

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन आज झालं. इराणी दिग्दर्शक अली अब्बासी यांनी दिग्दर्शित केलेला होली स्पायडर हा पर्शियन भाषेतील चित्रपट उद्घाटनाच्या सत्रात दाखवण्यात येणार आहे. भारतीय चित्रपट संगीतातल्या उल्लेखनीय योगदानासाठी ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर यांना या महोत्सवात एस.डी.बर्मन पुरस्कार दिला जाणार आहे.

**<><><><><>**

पंढरपुरात काल माघी यात्रा एकादशीच्या सोहळ्यासाठी संत निळोबा सेवा मंडळ मठामध्ये आलेल्या भाविकांनी भगर आणि आमटी खाल्ल्यामुळे १३७ भाविकांना विषबाधा झाली आहे. त्यापैकी ८ जण अतिदक्षता विभागात आणि १७ जण सामान्य रुग्ण विभागात आहेत. त्यांना पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलं असून वेळीच उपचार केल्यानं सर्व बाधित भाविकांची प्रकृती स्थिर असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान, अन्न आणि औषध प्रशासनानं मठामध्ये तयार केलेल्या भगर आणि आमटीचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले असून चौकशी सुरु आहे.

**<><><><><>**

पुण्यातील कोयता टोळीला रोखण्यासाठी शहर पोलिसांकडून विविध उपाययोजना केल्या जात असून त्याचाच एक भाग म्हणून आता कोयता खरेदी

करणाऱ्याला आपल्या आधार कार्डची माहिती संबंधित विक्रेत्याला द्यावी लागणार आहे. कोयता हा प्रामुख्यानं शेती कामासाठी आणि नारळ सोलण्यासाठी वापरला जातो, त्यामुळं शेतीकामासाठी त्यांची खरेदी करुन गुन्हेगारीसाठी कोयत्यांचा वापर करणाऱ्यांना या निर्णयामुळं चाप बसेल असा विश्वास पोलीस विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. याशिवाय ४५० बीट मार्शलची शहरात अहोरात्र गस्त घालण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत भोपाळमधे झालेल्या नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या ईशा टाकसाळेनं मुलींच्या दहा मीटर रायफल प्रकारात रौप्यपदक, तर स्वराज भोंडवेनं मुलांच्या २५ मीटर पिस्तूल रॅपिड फायर प्रकारात कांस्यपदक पटकावलं.

टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राच्या तनिषा कोटेचानं मुलींच्या एकेरीत अंतिम फेरी गाठत, पदक निश्चित केलं आहे. इंदूरमधे आज झालेल्या उपांत्य फेरीतल्या चुरशीच्या लढतीत तनिषानं हरियाणाच्या प्रिथोकी चक्रवर्तीचा ४-३ असा पराभव केला. चक्रवर्तीनं उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राच्या पृथा वर्टीकरचं आव्हान संपुष्टात आणलं. एकेरीच्या अंतिम फेरीत तनिषाची लढत दिल्लीच्या लक्षिता नारंगशी होणार आहे. तनिषानं याआधी या स्पर्धेतल्या दुहेरीत रिशा मीरचंदानी हिच्या साथीनं रौप्य पदक पटकावलं आहे.

मुलांच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्राच्या मोदी याला उत्तर प्रदेशाच्या दिव्यांश श्रीवास्तवनं पराभूत केलं. मात्र मोदी याला कांस्यपदकासाठी खेळण्याची अजूनही संधी आहे.

जिम्नॅस्टिक्समध्ये महाराष्ट्राच्या सारा राऊळ आणि रिया केळकर, तसंच मुलांमध्ये आर्यन दवंडे आणि मानस मनकवळे यांनी वैयक्तिक सर्वसाधारण विभागात अंतिम फेरीकडे आगेकूच केली.

आर्यननं प्राथमिक फेरीत पहिलं स्थान घेताना ६९ पूर्णांक ७ दशांश गुणांची कमाई केली. तर, मानस चौथ्या स्थानावर असून त्याचे ६६ पूर्णांक ६ दशांश गुण झाले आहेत. मुलींमध्ये सारानं ४० पूर्णांक ४ दशांश गुणांसह दुसरं स्थान मिळवलं, तर तिसऱ्या स्थानावर असलेल्या रियानं ४० पूर्णांक २ दशांश गुण घेतले आहेत.

मुष्टीयुद्ध स्पर्धेत महाराष्ट्राच्या अन्वर शेख आणि उस्मान अन्सारी यांनी उपांत्य फेरी धडक मारत दोन पदकं निश्चित केली.

बास्केटबॉलमधे, सलग दोन पराभवामुळे आव्हान संपुष्टात आलेल्या महाराष्ट्राच्या मुलींनी अखेरच्या साखळी सामन्यात राजस्थानवर ८९-५८ असा विजय मिळवला. महाराष्ट्राच्या विजयात पुन्हा एकदा अनन्या भावसार हिनं सर्वाधिक गुणांची नोंद केली. तिनं आज ३३ गुण नोंदवले. तिला गुंजन मंत्रीने १७ आणि भूमिका सर्जेनं १६ गुण नोंदवत सुरेख साथ केली.

बॅडमिंटनमध्ये महाराष्ट्राच्या नाईशा कौरनं अवघ्या ३५ मिनिटात पाचव्या अंतिम फेरी गाठली. तिनं गटातल्या महिला एकेरीच्या उपांत्य सामन्यात गार्गीचा पराभव करत पदार्पणातच पदकाची संधी मिळवली आहे.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंगणेवाडी इथं भरणाऱ्या भराडी देवी यात्रेला आता दोन दिवस उरले आहेत. या यात्रेसाठी जिल्ह्यात बाहेरुन मोठ्या संख्येने भाविक येतात. या पार्श्वभूमीवर आंगणेवाडीत जय्यत तयारी सुरु आहे. यंदा भाविकांना देवीचं दर्शन नऊ रांगांद्वारे होणार असून विशेष दक्षता घेण्यात येणार असल्याचं ग्रामस्थ मंडळाच्या

प्रतिनिधींनी सांगितलं. जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणेकडून सुद्धा यात्रेकरूंच्या सोयीसाठी पुरेपूर व्यवस्था करण्याचं नियोजन सुरू आहे.

कोकण रेल्वेने मुंबईहून येणाऱ्या चाकरमान्यांसाठी जादा फेऱ्यांचं नियोजन केलं आहे. शुक्रवारी रात्री ही गाडी मुंबईहून सुटणार आहे. या जादा गाडीला सिंधुदुर्गातल्या सर्व स्थानकांवर थांबे देण्यात आले आहे. तसेच रेल्वेच्या वेळापत्रकानुसार कणकवली आणि ओरोस स्टेशन वरून आंगणेवाडीसाठी जादा बस फेऱ्यांच नियोजन एसटीकडून करण्यात आले आहे.

या यात्रेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नारायण राणे आदी नेतेमंडळी उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

सासवड इथं येत्या रविवारी, ५ फेब्रुवारीला सत्यशोधक समाज परिषद होणार आहे. स्वागताध्यक्ष संभाजीराव झेंडे आणि ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**<><><><>**

राज्यात येत्या २ दिवसात सर्वत्र हवामान कोरड राहील तसच तापमानात फारसा बदल संभवत नाही असा अंदाज पुणे वेधशाळेन वर्तवला आहे. पुणे आणि परिसरात उद्या सकाळी हलके धुकं पडेल अशी वेधशाळेनं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**